| | |
|---|---|
| MHSN060012732024 | PWDVA Appln. 46/2024<br>Pratiksha Pravin Kadam Vs. Pravin Ramchandra Kadam |

## नि. क्र.०५ खालील आदेश

अर्जदार हिने सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ प्रमाणे अंतरिम आदेश मिळणेकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदारतर्फे वकिल श्री. के. एच. जाधव आणि जाबदारतर्फे वकिल श्री. सागर पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदार व जाबदारतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार हिचा अर्ज, जाबदार याचे म्हणणे व त्यातील कथने, कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता, खालील मुद्दे माझ्या विचाराधीन आले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासह मी नोंदवत आहे.

| अ. नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | अर्जदार ही तिच्यावर जाबदार यांनी कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केले ही बाब प्रथमदर्शनी शाबीत करते काय ? | **होकारार्थी** |
| ०२ | अर्जदार ही तिच्या मागणी प्रमाणे अंतरीम पोटगी म्हणून मिळण्यास पात्र आहे काय? | **अंशत: होकारार्थी** |
| ०३ | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करीता–**

४. यातील अर्जदार व जाबदार यांची परस्परविरोधी कथने पाहता, अर्जदार हिचा जाबदार नं. १ सोबत झालेला विवाह आणि अर्जदार व जाबदार नं. १ यांचेदरम्यानचे नातेसंबंध वादातीत नाहीत. यातील अर्जदार हिने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम १२ प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. महिलांचे कौटुंबिक हिंसाचार कायदाअन्वये कौटुंबिक हिंसाचार याची व्याख्या विषद केलेली असून, सदरच्या व्याख्यामध्ये शारिरीक हिंसाचार, लैंगिक हिंसाचार, शाब्दीक आणि भावनिक हिंसाचार आणि आर्थीक हिंसाचार यांचा समावेश केलेला असून, कौटुंबिक हिंसाचार या व्याख्येमध्ये हिंसाचाराचे व्याप्त स्वरुपात नमूद केलेले आहे. त्यामुळे वर नमूद केलेला प्रत्येक हिंसाचार हा कौंटुबिक हिंसाचार या व्याख्येखाली गणला जातो. यातील अर्जदार हिने जाबदार यांनी तिचेवर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे मूळ अर्जामध्ये व अंतरिम अर्जामध्ये कथन केलेले आहे. सदर अंतरिम अर्जाच्या आदेशाच्या वेळी प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे किंवा कसे हे पाहणे गरजेचे असते. सद्यपरिस्थीतीत अभिलेखावरील कथने कौटुंबिक हिंसाचार झाला ही बाब प्रथमदर्शनी शाबीत होण्याइतपत पुरेशी आहेत का इतके पाहणे गरजेचे ठरते. यातील अर्जदार आणि जाबदार याने आपल्या अर्जामध्ये आणि म्हणण्यामध्ये ब–याचशा घटनांचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे सद्यपरिस्थीतीत अभिलेखावरील असलेल्या कथनांचा विचार करुन प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे किंवा कसे हे पाहणे गरजेचे आहे.

५. यातील अर्जदार हिच्या अर्जातील कथनांचा विचार करीता लग्नानंतर जाबदार नं. १ याने वेळ काळ काही न बघता जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवण्याचा प्रयत्न करणे, तसेच तिच्या मनाविरुध्द शारिरीक संबंध प्रस्थापित करणे असा प्रकार केल्याचे कथन केले आहे. तसेच असे कथन केलेले आहे की, जाबदार नं. १ यांच्या

सदरच्या वागणुकीमुळे अर्जदार हिला मानसिक त्रास होऊन त्याचा परिणाम तिच्या शारिरीक प्रकृत्तीवर झाला होता. तसेच पुढे कथन केलेले आहे की, यातील जाबदार हे अर्जदार हिला शिवीगाळ व मारहाण करणे, अपमानास्पद बोलणे, स्वयंपाक करण्यावरुन बोलणे असे प्रकार केले असल्याचे कथन केलेले आहे. तसेच तिने पुढे कथन केलेले आहे की, अर्जदार ही गरोदर असताना तसेच डॉक्टरांनी गरोदरपणामध्ये शारिरीक संबंध प्रस्थापित न करणेबाबत सुचना दिलेली असताना जाबदार यांनी जबरदस्तीने नवव्या महिन्यापर्यंत अर्जदार हिचेसोबत शारिरीक संबंध ठेवले. तसेच जाबदार याने अर्जदार ही गरोदर असताना तिच्या पोटावर लाथ मारणे व जिवे मारण्याची धमकी दिली असे प्रकार केले असल्याचे कथन केलेले आहे. तसेच अर्जदार हिने जाबदार यांनी तिची शारिरीक व मानसिक पिळवणूक केल्याचे कथन केलेले आहे.

६. याउलट जाबदार यांनी अर्जदार हिच्या अर्जातील कथने स्पष्टपणे नाकारलेली आहेत. जाबदार यांनी कथन केले आहे की, अर्जदार हिच्यावर तिच्या आईचा प्रभाव होता व आईच्या सांगण्यावरुन अर्जदार ही मनाप्रमाणे वागत होती. तसेच पुढे कथन केलेले आहे की, अर्जदार ही जाबदार यांच्या सोबत वाद घालणे, घरातील कामे न करणे अशा गोष्टी करीत होती. त्यानंतर पुढे कथन केलेले आहे की, यातील अर्जदार हिची आई अर्जदार नं. २ हिला बघण्यासाठी आली असता त्यावेळी अर्जदार हिच्या आईने जाबदार हिच्या आईचा अपमान केला व पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार दिली. त्यानंतर अर्जदार ही तिच्या आईसोबत मुलीला घेऊन माहेरी निघून गेली. त्यानंतर पुढे कथन केलेले आहे की, त्यानंतर जाबदार यांनी अर्जदार हिस नांदविण्याचा प्रयत्न करुनदेखीलही अर्जदार ही नांदावयास आली नसल्याचे कथन केलेले आहे.

७. यातील अर्जदार व जाबदार यांच्या कथनांमधून घटनांचा ऊहापोह सदर आदेशाचे कामी सविस्तरपणे केलेला नाही. सदरची बाब ही पुराव्याअंती शाबीत होणे आवश्यक आहे. वर नमूद केल्याप्रमाणे प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला किंवा कसे

इतकेच पाहणे गरजेचे ठरते. यातील अर्जदार हिच्या कथनांचा प्रथमदर्शनी विचार करता यातील जाबदार यांनी अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केल्याची बाब दिसून येते. यातील जाबदार यांनी त्यांचेवरील आरोप नाकारलेले असले तरी सदरची बाब ही पुराव्याची आहे. तसेच अर्जदार ही माहेरी राहत असलेपासून जाबदार यांनी तिचे उदरनिर्वाहाकरीता काही रक्कम दिली याबद्दलदेखील जाबदार कोठेही कथन करीत नाही. हा देखील एक कौटुंबिक हिंसाचाराचा भाग आहे. त्यामुळे सदर प्रकरणात जाबदार यांनी अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केले ही बाब प्रथमदर्शनी शाबीत होते. म्हणून मी मुद्दा क्रमांक १ करीता होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक–२ करीता–**

८. यातील अर्जदार हिने तिचे व मुलीचे पालनपोषण करणेकरीता, कपडेलत्ता, औषधपाणी याकरीता म्हणून एकत्रीतपणे रक्कम रुपये २५,०००/– दरमहा इतकी अंतरीम पोटगीची मागणी केलेली आहे. अर्जदार हिने कथन केलेले आहे की, अर्जदार हिची कोणतीही मालमत्ता नाही तसेच तिची आई मोलमजुरी करुन स्वतःचा उदरनिर्वाह चालविते. तसेच जाबदार यांची वडीलोपार्जित मिळकती असून जाबदार यांना शेती, पशुपालन व वखार यापासून दरमहा रक्कम रुपये ४५ ते ५० हजार उत्पन्न मिळत असल्याचे कथन केले आहे.

९. याउलट जाबदार यांनी जाबदार नं. १ हा मिळेल ते काम करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित असल्याचे कथन केलेले आहे. तसेच जाबदार नं. २ व ३ हे वयस्कर असून आजारी असतात, त्यामुळे त्यांची जबाबदारी ही जाबदार नं. १ यांचेवर असल्याचे कथन केले आहे. तसेच जाबदार यांनी प्रयत्न करुन देखील अर्जदार ही नांदावयास आलेली नसल्याने जाबदार नं. १ यास सांसारिक सुखापासून वंचित रहावे लागत असल्याचे कथन केलेले आहे.

१०. यातील अर्जदार हिने अभिलेखावर शेतमिळकतीचे ७/१२ उतारे हजर केलेले आहेत. सदर उता–यांचे अवलोकन केले असता, जाबदार नं. ३ याचे नावे शेतजमीन मिळकत असल्याचे दिसून येते. यातील अर्जदार हिने सदरच्या ७/१२ उता–याव्यतिरिक्त जाबदार यांनी दरमहा ४० ते ४५ हजार इतके उत्पन्न मिळते याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. याउलट जाबदार नं. १ यांनी तो मिळेल ते काम करतो असे कथन केलेले आहे. परंतु त्याने तो कोणते काम करतो, कोठे काम करतो अगर त्यास कामापासून किती मोबदला मिळतो याबाबत कोठेही स्पष्टपणे कथन केलेले नाही. अभिलेखावरील कागदपत्रे पाहता जाबदार यांची शेतजमीन मिळकत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. जाबदार यांना मिळणारे उत्पन्न हा पुराव्याचा भाग आहे. त्यामुळे सद्यपरिस्थीतीत भारतीय पुरावा कायदा कलम ११४ प्रमाणे जाबदार यांचेविरुध्द प्रतिकूल अनुमान काढणे योग्य ठरेल. सद्यपरिस्थीतीत जाबदार नं. १ हा जरी मोलमजुरी करीत असेल तरी त्यास दरमहा रक्कम रुपये १२ ते १५ हजार इतके उत्पन्न मिळत असेल असा अनुमान काढणे योग्य ठरेल. वर नमूद केल्याप्रमाणे यातील जाबदार नं. १ यांनी अर्जदार यांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार हे निश्चीतच जाबदार नं. १ याचेकडून अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे. यातील जाबदार यांनी जाबदार नं. २ व ३ यांचे आजारपणाबद्दल कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. तसेच जाबदार नं. १ याचेवर अन्य कोणतीही जबाबदारी उदा. कर्ज वगैरे असल्याचे त्याचे कथनावरुन दिसून येत नाही. त्यामुळे सद्यपरिस्थीतीत अर्जदार यांच्या उदरनिर्वाहाकरीता म्हणून जाबदार नं. १ यास अंतरिम पोटगी देणेबाबत निर्देश देणे योग्य वाटते. सद्यपरिस्थीतीत महागाई, दैनंदिन गरजा, अर्जदार नं. २ हिचे वय यांचा विचार करीता जाबदार नं. १ यास अर्जदार नं. १ करीता दरमहा रक्कम रुपये ३०००/– आणि अर्जदार नं. २ करीता दरमहा रक्कम रुपये २,०००/– इतकी अंतरिम पोटगी देणेबाबत आदेश पारित करणे योग्य व न्यायोचित आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ करीता अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक–३ करीता–</u>**

११. वर नमूद केल्याप्रमाणे जाबदार यांनी अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केल्याची बाब प्रथमदर्शनी शाबीत होते. त्याचप्रमाणे जाबदार नं. १ याने अर्जदार यांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय अथवा व्यवस्था केली नसल्याचे दिसून येते. तसेच जाबदार नं. १ याची अर्जदार यांच्या उदरनिर्वाहाची व पालनपोषणाची व्यवस्था करणेइतपत आर्थीक क्षमता असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार हे निश्चितपणे जाबदार नं. १ याचेकडून अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | अर्जदार हिचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| २ | जाबदार क्र.१ याना आदेशीत करणेत येते की, त्याने अंतरीम पोटगी म्हणून अर्जदार नं. १ हिस दरमहा रक्कम रुपये ३,०००/– आणि अर्जदार नं. २ हिला दरमहा रक्कम रुपये २,०००/– इतकी मुख्य अर्ज निकाली लागेपावेतो प्रस्तुतचा अर्ज दाखल केले तारखेपासून द्यावी. |
| ३ | सदर आदेशाची प्रत अर्जदार हिला विनामुल्य देण्यात यावी. |

ANIRUDHA SUNIL RANE
Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2026.02.06 11:12:37 +0530

मिरज
दि.०३.०२.२०२६.

(अनिरुध्द एस. राणे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज.